महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☏२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☏२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक : १४४२(१)(४)/२०२१/२३ दिनांक : १५ डिसेंबर, २०२२

**-: प्रसिद्धीपत्रक :-**

**विषय :-** **पोलीस उपनिरीक्षक मर्यादित विभागीय स्पर्धा मुख्य परीक्षा - २०२१**
अंतिम निकाल

**संदर्भ :-** जाहिरात क्रमांक ५२/२०२२

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत दिनांक ३० जुलै, २०२२ रोजी घेण्यात आलेल्या पोलीस उपनिरीक्षक मर्यादित विभागीय स्पर्धा मुख्य परीक्षा - २०२१ या परीक्षेतील पोलीस उपनिरीक्षक संवर्गातील एकूण २५० पदांपैकी २४९ पदांचा अंतिम निकाल संबंधित उमेदवारांनी अर्जात केलेल्या दाव्यांच्या अनुषंगाने त्यांची पात्रता शासन स्तरावर मूळ प्रमाणपत्रांवरुन तपासण्याच्या अधीन राहुन दिनांक १५ डिसेंबर, २०२२ रोजी जाहीर करण्यात आला आहे.

**२.** प्रस्तुत परीक्षेमधील काही उमेदवारांसंदर्भात प्रतिरोधित करण्याची कार्यवाही प्रस्तावित असल्यामुळे एका पदाचा निकाल राखून ठेवण्यात आला आहे.

**३.** सदर परीक्षेमध्ये बीड जिल्ह्यातील श्री. नाकाडे भागवत महादेव, बैठक क्रमांक MB ००१३५५ हे राज्यात प्रथम आले आहेत.

**४.** उमेदवारांच्या माहितीसाठी प्रस्तुत परीक्षेचा अंतिम निकाल आयोगाच्या https://mpsc.gov.in संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आला आहे.

**५.** प्रस्तुत निकालात नमुद केलेल्या सर्व शिफारसपात्र उमेदवारांच्या शिफारशी, त्यांनी प्रस्तुत परीक्षेच्या अर्जात नमूद केलेल्या दाव्यांच्या अनुषंगाने त्यांची पदासाठीची पात्रता मूळ प्रमाणपत्रावरून तपासण्याच्या तसेच आरक्षणाचे दावे/प्रमाणपत्रे विहित प्राधिकरणाकडून तपासण्याच्या अटीच्या अधीन राहून शासनाकडे करण्यात येत आहेत. उमेदवारांनी आवेदनपत्रात दिलेली माहिती खोटी अथवा चुकीची आढळून आल्यास अथवा आवेदनपत्रातील दाव्यानुसार आवश्यक प्रमाणपत्रांची पूर्तता न केल्यास, शासन स्तरावर अधिसूचनेतील तरतूदीनुसार दावे तपासतांना व अन्य कारणामुळे अपात्र ठरणाऱ्या या संबंधित उमेदवारांची उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

**६.** प्रस्तुत परीक्षेचा निकाल विविध मा. न्यायालयात/मा. न्यायाधिकरणात दाखल करण्यात आलेल्या विविध न्यायिक प्रकरणातील अंतिम न्यायनिर्णयाच्या अधीन राहून जाहीर करण्यात आला आहे.

**७.** प्रस्तुत अंतिम निकालात शिफारसपात्र न ठरलेल्या ज्या उमेदवारांना त्यांच्या उत्तरपत्रिकेतील गुणांची पडताळणी करावयाची आहे. अशा उमेदवारांनी गुणपत्रके प्रोफाईलमध्ये पाठविल्याच्या दिनांकापासून १० दिवसांत, आयोगाकडे ऑनलाईन पद्धतीने विहित नमुन्यात अर्ज करणे आवश्यक आहे. (कृपया आयोगाच्या संकेतस्थळावरील उमेदवारांना सर्वसाधारण सूचनेतील सूचना क्रमांक ६.४.४ पहावे)

ठिकाण : मुंबई

उपसचिव (परीक्षोत्तर (अ.प.)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग